UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक।।

### पुरवणी अंक ४८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)

- **शके १९४५**
- **वर्ष : ९२**
- **पुरवणी अंक : ४८**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- डॉ. अशोक टी. खोब्रागडे
- डॉ. प्रफुल्ल एस. वैराळे
- डॉ. रामचंद्र एम. वासेकर

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

सदस्यता वर्गणी : रु. २५००/–

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# अनुक्रमणिका


१. **A Quest for Identity by Double Marginalized Uruvi in *Karna's Wife* by Kavita Kane**

- i) Miss. Ruchira P. Bhoyar, ii) Dr. S.G. Kannake -------------------------- ९

२. **An Analysis of Sudha Murty's Dollar Bahu And Gently Falls The Bakula From An Ecofeminist Perspective**

- i) Anupama M. Lawatre, ii) Dr. Sanjay B. Urade ------------------------- १३

३. **Environmental Ethics in Jataka Tales: A Literary Exploration**

- i) Dipak Shivdas Wakde, ii) Dr. Prafulkumar Vaidhya --------------------- १७

४. **Exploring Self-Realization and Motivation: Lessons from Robin Sharma's The Saint, the Surfer, and the CEO**

- i) Ravi G. Gajbhiye, ii) Dr. S. M. Warkad --------------------------------- २१

५. **Influence of Media on Language And Literature in 21st Century**

- Dr. Shravan R. Banasure ----------------------------------------------- २६

६. **Influence of Racial Elements on The Justice in to Kill A Mockingbird & A Passage to India**

- i) Prof. Ganesh Pralhadrao Surjuse, ii) Dr.Priyadarshi V. Meshram -------- ३०

७. **Language Education in NEP 2020: An Analysis of Objectives and Approaches in Postmodern ELT**

- i) Amol Janardhan Kutemate, ii) Dr. Akshay. V. Dhote ------------------ ३४

८. **Silence is not Surrender: Interrogating Patriarchy in UrmilaPawar's*The Weave of My Life***

- i) Shital Nandkishor Chavan, ii) Dr. Sunil G. Chaudhari ------------------- ३९

ISSN No. 2394-5990

९. **Barrenness of Married life in Indian Society as Depicted in Manju Kapur's *A Married Woman***

- i) Smita Wasudeo Neware, ii) Dr. S.G. Gahane ------------------------- ४३

१०. **Struggle for Identity as Depicted in the Novel *ChottiMunda and His Arrow***

- i) Archana Sitaramji Rathod, ii) Dr. Dharmapal B. Fulzele ---------------- ४६

११. **Unraveling Identity Complexities in *The Shadow Lines***

- i) Prof. Amar Tulshiram Balki, ii) Dr. Priyadarshi V. Meshram ------------ ५२

१२. **Breaking Boundaries: Exploring Innovative Trends in Contemporary Indian Fiction Writing in English**

- Dr. Vaibhao B. Pimpale ------------------------------------------------ ५८

१३. **Utilization of Information and Communication Technology Tools in the Educational Process**

- Atul M Gavaskar ---------------------------------------------------- ६३

१४. **Contextualizing Adivasi Literary Discourse in *Bhasha* Literature of India- With Special Reference of Novel Writings In Jharkhand**

- Dr. Manoj Shankarrao Madavi ---------------------------------------- ६७

१५. **Examining the story *'The Namesake'* by Jhumpa Lahiri: A conceptual leap transcends text**

- Mr. Swapnil P. Dhomane, Prof. Dr. Akshay V. Dhote --------------------- ७१

१६. **Perspectives of Teachers And Students of Undergraduate Arts Faculty Regarding Internal Assessment**

- Dr. Bhavana M. Rai --------------------------------------------------- ७७

१७. **'बारोमास' या ग्रामीण कादंबरीतून प्रकटणारी भाषाशैली**

- १) प्रा. सतीश स. कर्णासे, २) डॉ.कोमल वी.ठाकरे ---------------------------- ८४

१८. **अरुणा सबाने यांच्या 'अनुबंध' कथासंग्रहातील स्त्री दर्शन**

- १) कु. निशा सुकदेव कापकर, २) डॉ. नरेंद्र आरेकर --------------------------- ८९

१९. **दिनेश काळे यांच्या कादंबरीतील ग्रामीणविश्व**

- १) प्रा. यादवराव रा. गहाणे २) डॉ. विलास आर. खुणे ------------------------ ९३

२०. **दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र' ललित साहित्यातील निसर्गवर्णन**

- १) सुजाता माधवराव नरुले २) डॉ. गणेश एन चुदरी --------------------------- ९६

२१. **नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव**

- १) प्रा. प्रदिप केशव चापले २) डॉ. नरेंद्र तु. आरेकर --------------------------- १००

२२. **राष्ट्रसंत तुकडोजींचे शैक्षणिक विचार**

- १) प्रा. धनराज डी. मुरकुटे २) डॉं. कोमल वि. ठाकरे -------------------------- १०४

२३. **समकालीन मराठी साहित्य व समाजशास्त्रीय अनुबंध**

- प्रा.गणेश जा.मस्के ------------------------------------------------------- १०८

२४. **समकालीन वैदर्भीय आंबेडकरी मराठी काव्यदर्शन**

- डॉ. विजय रैवतकर ------------------------------------------------------ ११३

२५. **कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मराठी साहित्य**

- डॉ. सविता गोविंदवार --------------------------------------------------- ११८

२६. **सदानंद देशमुख यांच्या 'गावकळा'आणि केशव सखाराम देशमुख यांच्या 'टिळा'या कविता संग्रहातील शेतकरी जीवन दर्शन**

- डॉ. महेश बापुरावजी जोगी ----------------------------------------------- १२२

ISSN No. 2394-5990

# समकालीन वैदर्भीय आंबेडकरी मराठी काव्यदर्शन

**डॉ. विजय रैवतकर**
महात्मा गांधी कला,
विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,
आरमोरी, जिल्हा गडचिरोली

**सारांश (Abstract) :**

समकालीन वैदर्भीय आंबेडकरी मराठी कवितेतून वर्तमानातील विविध समस्या, प्रश्न आणि समकालीन वास्तव याचे यथार्थ चित्रण झाले आहे. समकाळातील विविध प्रश्न वैदर्भीय मराठी आंबेडकरी कवींनी त्यांच्या कवितेतून मांडत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूल्यविचारच्या केंद्राभोवती वर्तमानात लोकशाही मूल्य जिवंत राहावीत, असा आशावाद व्यक्त केला व या ना त्या कारणाने लोकशाहीची होत असलेली हत्या व त्याला कारणीभूत असलेली समाजव्यवस्था, त्यातील विविध विषय कवी आपल्या संवेदनशीलतेतून व्यक्त करताना दिसून येतात. कवींनी प्रामुख्याने वर्तमानातील धर्मांधता, नवजातीयवाद, वाढती गुन्हेगारी वृत्ती, ग्रामीण जीवनातील बकाल वास्तव, स्त्रियांचे होत चाललेले वस्तूकरण, भांडवलशाही प्रवृत्ती त्यातून जन्माला आलेली भोगवृत्ती, माणसाचे होत चाललेले यांत्रिकीकरण, गरीब – श्रीमंत यातील वाढणारी दरी, सत्तांत राजकारण, राजकीय हेवेदावे, मानवी अंतर्मनातील असंख्य प्रश्न, अंतर्मनातील द्वंद्व, मानवी वृत्ती – प्रवृत्ती, शिक्षणाचे होत चाललेले बाजारीकरण, ग्रामीण जीवनातील हेवेदावे, गावगाड्यातील विषमता असे विविध प्रश्न वैदर्भीय मराठी आंबेकडकरी कवितेतून कवींनी मांडले आहेत. ही कविता केवळ आजचे भीषण वास्तव मांडून मोकळी होत नाही तर व्यवस्था बदलण्याची भाषा देखील अत्यंत संयतपणे करते तसेच बदललेल्या जागतिक संदर्भात माणूसमूल्य आणि मानवी सौंदर्य अबाधित राहण्याचा आशावाद व्यक्त करते.

**बीज शब्द (Key Words) :** दलित, आंबेडकरी, आंबेडकरवाद, कविता, काव्य

**प्रस्तावना (Introduction) :**

मराठी साहित्यप्रांतामध्ये आंबेडकरी साहित्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मराठी साहित्याचा विचार आंबेडकरी साहित्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. मराठीतील समग्र साहित्यलेखनाला आंबेडकरी मराठी साहित्याने मौलिकता प्रदान करण्याचे कार्य केले आहे. मराठी साहित्याचा चेहरा मोहरा बदलविण्याचे कार्य दलित साहित्याने अर्थात आंबेडकरी साहित्याने केले असल्याचे प्रामुख्याने दिसून येते. आंबेडकरवादी मराठी साहित्य बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वदृष्टीतून आणि विचारसरणीतून साकार झाले असून आंबेडकरवादी जाणिवेतून, लोकशाही तत्त्वातून हे साहित्य उत्तरोत्तर बहरू लागले. एकूणच मराठी साहित्यनिर्मितीला आंबेडकरवादी साहित्याने नवी व विलक्षण जीवनदृष्टी प्रदान केली. या नवीनतम जीवनदृष्टी आणि विचारदृष्टीमुळे आंबेडकरवादी मराठी साहित्याचा परीघ कायमच विस्तारित होत राहिला. आज आंबेडकरवादी मराठी साहित्य भारतीय पातळीवर सर्वश्रेष्ठ ठरले आहे. आंबेडकरी साहित्याच्या निर्मितीला अनेक पदर आहेत. आंबेडकरी मराठी साहित्याने भारतीय साहित्यात अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. आंबेडकरी साहित्याचे मूळ महाराष्ट्राच्या मातीमध्ये रुजले असले तरी आंबेडकरी मराठी साहित्याच्या विकसनात विदर्भातील मातीचा देखील गंध दरवळलेला आहे. विदर्भाच्या भूमीने आंबेडकरी मराठी साहित्याच्या निर्मितीत वैशिष्ट्येपूर्ण योगदान दिले आहे.

प्रस्तुत लेखात विदर्भातील आंबेडकरवादी कवितेचा विचार अपेक्षित आहे अर्थात या शोधलेखाची ही मर्यादा आहे. हा शोध घेत असताना प्रस्तुत निबंध समकाळातील अर्थात २००० नंतरच्या विदर्भातील आंबेडकरी कवींच्या कवितेतील आशय वैशिष्ट्यांचा, कवींनी व्यक्त केलेल्या जीवनजाणिवेचा, त्यांच्या अनुभूतीविश्वाचा आणि मराठी साहित्यातील, मराठी काव्य प्रांतातील वेगळेपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रामध्ये विदर्भ प्रांत याचे विशेष असे स्थान आहे. आंबेडकरी मराठी कविता ही महाराष्ट्रातील सगळ्या प्रांतातील कवींच्या अनुभूतीविश्वातून प्रसवली आहे, असे असले तरी विदर्भाचे योगदान आंबेडकरवादी मराठी कविता समृद्ध करण्यात महत्त्वाचे राहिले आहे, असे म्हणावे लागते. विदर्भाची भूमी

ही चळवळीची भूमी आहे. या भूमीला विविध प्रकारच्या सामाजिक – सांस्कृतिक चळवळींचा इतिहास असल्याचे आपणास दिसून येते. विविध चळवळींमध्ये विदर्भातील आंबेडकरी चळवळ नवसंस्कृती, नवसाहित्य निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. विदर्भ प्रांतात बाबासाहेब आंबेडकरांच्या मूल्यदृष्टीतून, त्यांच्या तत्त्वविचारातून प्रेरणा घेऊन आंबेडकरी मराठी साहित्याची पायाभरणी किसन फागोजी बनसोडे, एल.एन. हरदास, एम. डी. पंचभाई, ना. रा. शेंडे, दीनबंधू शेगावकर, कवी राजानंद गडपायले यांनी केल्याचे दिसते. यांनी विदर्भात वैचारिकदृष्ट्या दलित साहित्यविषयक विचारांची मुहूर्तमेढ रोवण्यात मोलाचे योगदान दिले आहे; पुढे डॉ. यशवंत मनोहर यांनी त्यांच्या समीक्षादृष्टीतून, त्यांच्या वैचारिक मांडणीतून आंबेडकरी विचारास दिशा देण्याचा अत्यंत निष्ठापूर्वक प्रयत्न केला. तसेच वैदर्भीय आंबेडकरी मराठी साहित्य वामन निंबाळकर, ताराचंद खांडेकर, भाऊ लोखंडे, ज्योती लांजेवार इत्यादींच्या समीक्षा लेखनातून विकसित झाले.

समकालीन वैदर्भीय मराठी आंबेडकरी कवितेचा विचार करताना यात प्रामुख्याने तिसऱ्या पिढीतील कवींचा उल्लेख करावा लागतो. २००० नंतरच्या कालखंडात अर्थात या समकालीन जीवनात, वर्तमान लोकनाथ यशवंत, युवराज सोनटक्के, चंद्रकांत वानखेडे, अशोक बुरबुरे, प्रमोद वाळके, विलास भवरे, महिंद्र गायकवाड, मच्छिंद्र गायकवाड, अविनाश गायकवाड, विनोद मेश्राम, नोमेश मेश्राम, सुखदेव पाटील, राजेश डोंबारे, सुनील अवचार, विद्याधर बंसोड, वामन गेडाम, सुरेश वर्धे, संदीप नंदेश्वर, संध्या रंगारी, संजय गोरघाटे, मच्छिंद्र चोरमारे, दीपक अंबादास, अजय चिकाटे, भूषण रामटेके, सुनील अवचार, दिलीप वीरखेडे, अशोक गडकरी, दीपक रंगारी, सुरेश शेंडे, मिलिंद उंबरे इत्यादी विविध कवी आंबेडकरी मराठी कविता लिहीत आहेत. या कवींच्या कविता वैशिष्ट्यपूर्ण असून त्यांच्या कवितांतून कवी बाबासाहेब आंबेडकरांचा मूल्यविचार वर्तमानात रुजविण्याची भूमिका घेताना दिसतात. तसेच वर्तमानातील विविध प्रश्न त्यांच्या कवितेतून मांडून वर्तमानातील प्रश्नांना भिडण्याचा देखील यशस्वी प्रयत्न ते करत आहेत. या कवींच्या कवितांचा समग्रलक्षी विचार केला असता आंबेडकरी जीवननिष्ठा त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने दिसून येते.

लोकनाथ यशवंत विदर्भातील प्रमुख कवी. ते समकालीन आंबेडकरी वैदर्भीय मराठी कवितेतील एक प्रमुख मानदंड आहेत. 'पुन्हा चाल करूया' (२००९) यातून त्यांनी आंबेडकरी जीवनजाणिवांच्या अभिव्यक्तीची नवी संयम, शांत पण तितकीच अस्वस्थ करणारी वाट चोखाळली आहे. त्यांच्या कवितेतून त्यांनी सभोवतालच्या वास्तवावर अत्यंत मार्मिक भाष्य करून वाचकांचे लक्ष्य वेधले आहे. मुळात त्यांची कविता चिंतनशील आणि विचारशील अशी आहे. त्यांनी त्यांच्या कवितेतून आंबेडकरी चळवळीतील अंतर्विरोधावर, ढोंगीपणावर, विकाऊपणावर, निष्ठाशून्यतेवर हल्ला चढविला आहे. शिवाय समकाळातील दांभिक व बेगडी वास्तव त्यांच्या कवितेतून वाचकांसमोर मांडले आहे.

महेंद्र गायकवाड यांचे 'काजव्याच्या खांद्यावर संगिनी' (२००२) 'ओलीस ठेवलेली माणसे' (२०१०) हे महत्त्वाचे काव्यसंग्रह. या संग्रहातून त्यांनी समकाळातील दुःख, वेदना, मानवी जीवनाच्या वाट्याला आलेली अगतिकता याचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे केले आहे. शिवाय वर्तमानातील लोकशाही व्यवस्थेवर आणि भांडवली व्यवस्थेवर परखड टीका केली आहे. लोकशाही मूल्य पायदळी तुडवून भांडवलदारांच्या, धनिकांच्या, सावकारांच्या हातात जाणारी राजसत्ता आणि त्यातून सर्वसामान्यांच्या वाट्याला येऊ पाहणारी गुलामी आणि माणसाची होत असलेली अधोगती, हे विषय त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने प्रकट होतात. दलित, शोषित, पीडित, बहुजन व भटके या सर्वांना बाबासाहेब आंबेडकर यांनी जो माणूस जगण्याचा मार्ग दिला त्याबद्दल बाबासाहेबांच्या विचारांविषयीची कृतज्ञताही ते त्यांच्या कवितेतून अगदी सहजपणे व्यक्त करतात. त्यांची अशीच एक महत्त्वाची कविता,

''बाबासाहेबांमुळे माळरानावरचे जीवन धगधगले/ उजळले
बुद्धाला कवेत घेऊन निर्लेपही झाले...''

मच्छिंद्र चोरमारे यांचा 'तापलेले दिवस' (२००६) हा महत्त्वाचा कवितासंग्रह. त्यांची कविता परिवर्तनवादी विचारांच्या मार्गाने चालणारी आहे. आंबेडकरवादी मूल्यविचारातून येणाऱ्या संकटांना आणि समस्यांना सामर्थ्याने तोंड देता येण्याचा आशावाद कवी व्यक्त करतो. ते एका कवितेत म्हणतात,

''भीमा तू नसता तर काय झाले असते ?
अंधारात चाचपडलो असतो ...आम्ही
गुलामगिरीत जीवन जगलो असतो आम्ही
पण तुझ्या जन्माने
आमचं अस्तित्व निर्माण झालंय

पुढे कवी म्हणतो,

''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकारण्यासाठी
मग आम्ही निळा फडकवणार आहे ...!
हेच आमचं अंतिम ध्येय आहे.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे प्राप्त झालेल्या अस्तित्वभानाचा कवी विचार करून बाबासाहेबांचे विचार

समाजमनात पेरण्याचा विचार प्रकर्षाने करताना दिसतो. त्यामागील त्यांची भूमिका मानवतावादी आहे.

सुरेश वर्धे यांचा 'अर्धशतकातील प्रवास' (२००७) महत्त्वाचा कवितासंग्रह. त्यांनी त्यांच्या कवितांतून आंबेडकरी विचार अत्यंत प्रभावीपणे मांडला आहे. त्यांच्या कवितासंग्रहात बाबासाहेबांवरील बर्याच कविता आढळतात. दिलीप वीरखेडे यांचा 'ऐन पस्तीशीत' (२०११) हा कविता संग्रह आंबेडकरी आशय व्यक्त करणारा आहे. अस्तित्ववादी जीवनदृष्टीतून आपले विचार कवीने कवितेतून मांडले आहेत.

'केंद्र हरवत चाललेल्या वर्तुळाचा परीघ' (२०१६) हा कवितासंग्रह सुनील अवचार यांचा. त्यांनी त्यांच्या कवितांतून वर्तमान व्यवस्थेवर परखड असे भाष्य केले आहे. वर्ण आणि वर्ग यातील जगण्यातील विकृती त्यांची कविता टिपते.

''जाड भाकरीऐवजी Chocolate Bar<br>
साध्या पाण्याऐवजी Bisleri Aquaguard<br>
फाटक्या झोपड्यांसाठी Air Conditioned System<br>
मग्रूर अंधारात Halogen<br>
अरुंद रस्त्यावर फिरण्यासाठी<br>
एअर इंडियाचे पास<br>
देशीवाद्यांसाठी व्हिसा<br>
पर्यावरणवाद्यांसाठी अण्वस्त्र<br>
अंधश्रद्धेसाठी नासा<br>
जगण्यात वर्ण – वर्गाची विकृती<br>
या शतकातील ही ग्लोबल संस्कृती''

जगण्यातील विसंगती सुनील अवचार अत्यंत प्रभावीपणे मांडताना दिसून येतात.

विद्याधर बंसोड यांचा 'फिनिक्स पक्षांच्या कविता' (२००६) हा महत्त्वाचा कवितासंग्रह. त्यांनी या कवितासंग्रहातून समकालीन वास्तवातील बोचरी जाणीव व्यक्त करून माणुसकीचे बोट धरून नवा भारत घडविण्याचा आशावाद व्यक्त केला आहे. त्यांची कविता वर्तमानातील राजकारण आणि समाजकारण यातील वास्तवाचा वेध घेते. स्वार्थी आणि भ्रष्टाचारी राजकीय नेतृत्वावर सडकून टीका करण्यासाठी त्यांची कविता मागेपुढे पाहत नाही. शिवाय तकलातून नेतृत्वाच्या मागे जाणाऱ्या अनुयायांची अवस्था यावर ते परखड भाष्य करतात. ते म्हणतात,

'कुठे हरवला कणा पाठीचा<br>
कुठे हरविले फिनिक्स येथील<br>
याची त्याची हांजी हांजी करता<br>
माणूस झाला सुकले बोंबील<br>
इथलं इमान आता प्रदूषित झालं आहे यार<br>
शहरातल्या नद्यांसारखं'

ही समकालीन वास्तवाच्या विसंगतीची बोचरी जाणीव त्यांच्या कवितेतून प्रकट होते.

भूषण रामटेके यांचा 'मी रांगेतच उभा आहे' (२०१८) हा कवितासंग्रह. या कवितासंग्रहातील कवितांतून कवीने आजच्या काळातले वास्तव प्रकट केले आहे. माणसाच्या वाट्याला येणारा भ्रमनिरास, सामान्य माणसाला येणारी हतबलता, समकाळातील राजकीय – सामाजिक वास्तव त्यांच्या कवितेतून ते व्यक्त करतात. कवी म्हणतो,

'हे माणसाच्या पोरा<br>
मी बसणार नाही स्वस्त<br>
धरलाच आहे तुझा हात<br>
शेवटच्या श्वासापर्यंत<br>
गाईन धम्मगान'

बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारक्रांतीची मशाल हाती घेऊन माणूस जगण्यासाठी अविरत संघर्ष करण्याची तयारी कवी कवी दाखवतो. एका कवितेत कवी म्हणतो,

'तुझ्या २ बीएचके मधून दिसत नाहीहे<br>
बाहेर धुमसणारा आक्रोश<br>
कानाचे पडदे फाटेपर्यंतची<br>
आर्त किंकाळी<br>
हैवानांच्या भेसूर हसण्यांचा आवाज<br>
लहान मुलांच्या केविलवाणी रडण्याचे स्वर<br>
रक्ताचा सडा<br>
इतस्ततः हा विखुरलेले मासांचे तुकडे<br>
नागविलेल्या बाया'

आजच्या वर्तमानातील हृदयशून्य माणसाचे चित्रण कवीने प्रभावीपणे केले आहे.

अजय चिकाटे यांचा 'मुठीतील वाळू' (२०२१) हा कवितासंग्रह वैदर्भीय मराठी आंबेडकरी कवितेत लक्षणीय स्थान निर्माण करणारा आहे. समाज, सामाजिकता आणि व्यक्तिगतता या जाणिवेचे मिश्रण त्यांच्या कवितेतून दिसून येते. त्यांची काव्यशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. समाजजीवनातील विसंगती आणि त्यातील विरोधाभास ते अत्यंत संयतपणे व्यक्त करतात. त्यांच्या कवितेतील शब्द प्रतिमांची झालर आंबेडकरी कवितेला नवी दिशा प्रदान करणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा व्यापक जीवन दृष्टिकोन कवीने त्यांच्या कवितातून व्यक्त केले आहे. जीवनव्यवहाराकडे सम्यक व विवेकी दृष्टीने बघण्याचा आशावाद कवी व्यक्त करतो. त्यांची कविता अनुभवसंपन्न अशा जाणिवेचा प्रत्यय देते. दुःख, दरिद्रय, गरिबी याची जाणीव, या वेदना अत्यंत संयतपणे कवी व्यक्त करतो. कवी बाबासाहेब आंबेडकरांविषयीच्या जाणिवा व्यक्त करताना म्हणतो,

'रणरणत्या वाळवंटातून
अमानुषपणे लादलेल्या आयुष्याच्या
आम्ही पखाली वाहताना
तू झालास ओॲसिस...
गरुड झेप घेतली आहे आकाशात
तुझ्या निळ्या विचार पक्षांनी
आता कोणतेही सावट
आणि कोणतीही वाट
या पक्षांना थोपवू शकत नाही
थोपवू शकणार नाही'

बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे बळ घेऊन जीवनाची वाट चालण्याची भाषा कवी करतो आहे.

'वेदना आभाळ झाली' (२००८) 'रक्तफुलांचे ताटवे' (२०२३) हे दोन कवितासंग्रह नोमेश मेश्राम यांचे आहेत. त्यांनी त्यांच्या कवितांतून वैश्विक मानवी मूल्यभाव व्यक्त केला आहे. उदात्त मानवी मूल्य समाजमनात रुजण्याचा आशावाद ते त्यांच्या कवितेतून व्यक्त करतात. समाजमनाला व्यापक जीवनभान देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या कवितेतील शब्दप्रतिमा आणि प्रतीकांचे नावीन्य रसिकांना पृथक अनुभूतीविश्वात घेऊन जाते. त्यांच्या 'रक्त फुलांच्या ताटवे' मधील संविधानाची कविता अत्यंत महत्त्वाची आहे. कवी म्हणतो,

'धर्मसभेला जमले नाना मुनी, मौलवी, साधू
अजोड प्याऱ्या स्वधर्माची खीर लागले रांधू
दाढी कुरवाळीत मौलवी कुराण खासा म्हणे
गंध टिळ्यांचा भगवा साधू गाई गीतेची वचने
कुणी समयसार, ग्रंथसाहिबा, कुणी बायबल नामी
त्रिपीटकातून सुखी जगाची भदंत देतो हमी
सभेत मुलगा माझा संविधान काय? हे पुसतो
धर्मवजा होतो माझ्यातून मीच तिरंगा होतो'

धर्मपल्याड मानवतेचा जागर करणाऱ्या संविधानिक लोकशाही मूल्यांची जाणीव झाल्यास मानवी जीवनाला खऱ्या अर्थाने सौंदर्य प्राप्त होईल, असे कवीला वाटते. त्यांच्या कवितेतील विद्रोहाचा सूर परंपराप्रिय संस्कृतीच्या व धर्मव्यवस्थेच्या जाचाखालील मानवविघातक कृत्यांविरुद्ध आक्रोश करते; तेव्हा विश्वशांतीचा नवा संदेश घेऊन येते आणि परिवर्तनाची ऊर्जादायी अशा मानवी मनात पेरते. माझ्या गावात येताना या कवितेत ते म्हणतात,

'इथे येताना तुझ्या मेंदूतील जाती-धर्माची उकीरडे झाडून ये
अहंकाराचे, लुच्चेगिरीचे श्वासाश्वासांवर पेरलेले मुखवटे काढून ये
दया, क्षमा, शांतीपथाकडे जाणाऱ्या दिशा पायात मांडून ये
मनाची गंजली पाटी सहिष्णुतेच्या धारदार रबराने खोडून ये'

मानवी संस्कृतीतील प्रेम, सहिष्णुता या चिरंतर मूल्यांचा कवी पुरस्कार करतो. विद्रोह, बंड, क्रांती असे शब्द मनात रुंजी घालून प्रश्न सुटणारे नाहीत तर संवेदनशीलमनाने झोपडपट्टीत जाऊन वेदना समजून घेण्याची भाषा कवी करतो. कवीने वैश्विक मानवतेचा विचार केंद्रस्थानी ठेवून आपल्या अनुभूतीचा शब्दाविष्कार केला आहे. कवीने त्यांच्या कवितांतून उपेक्षितांचे दुःख, समाजजीवनाची व्यथा, विषाक्तव्यवस्था, यंत्रवत जीणे, समकालीन राजकीय वास्तव असे कितीतरी विषय हाताळले आहेत. वर्तमानातील विविध सुक्ष्म संदर्भ त्यांच्या कवितेत सापडतात. त्यांची कविता वाचकांना अंतर्मुख करून जाते.

एकूणच वरील वैदर्भीय आंबेडकरवादी कवींनी मराठी कवितेला वैशिष्ट्यपूर्ण आशयनुभूतीचा प्रत्यय दिला आहे. सर्वच कवींच्या कवितांचा धांडोळा घेणे ही लेखाची आणि शोधनिबंधाची शब्द मर्यादा असल्याने काही कवींच्या कवितांवर भाष्य करून इतर वैदर्भीय कवींचा नामोल्लेख प्रस्तुत लेखात करण्यात आला. वरील कवींच्या कवितांतून समकालीन वास्तव प्रखरपणे प्रकट झाले असून आंबेडकरी विचारातील माणूसमूल्याधारित जीवनदृष्टी त्यातून प्रकट होते. कवींनी व्यापक समाजभान देण्याचा प्रयत्न त्यांच्या कवितांतून केला, हे विशेष.

**निष्कर्ष (Conclusion) :**

वैदर्भीय आंबेडकरी मराठी कवितांचा तपशीलवार विचार करताना काही निष्कर्ष हाती लागतात ते खालीलप्रमाणे -

१. वैदर्भीय आंबेडकरी मराठी कवितेचे योगदान एकूणच मराठी कवितेत महत्त्वपूर्ण असून दलित जीवनानुभवातील दुःख, त्यातील दाहक वास्तव त्यातून प्रकट झाले आहे.
२. वैदर्भीय आंबेडकरी मराठी कविता चळवळीतून पुढे आली त्यामुळे वास्तविक व खरेखुरे दर्शन या कवितेतून घडलेले दिसून येते.
३. पहिल्या पिढीतील यशवंत मनोहर, वामन निबाळकर, ज्योती लांजेवर यांच्या कविता आणि त्यांची समीक्षादृष्टी समकालीन कवींच्या अभिव्यक्तीसाठी प्रेरक ठरली आहे.
४. वैदर्भीय आंबेडकरी मराठी कविता समाजपरिवर्तनाचे शस्त्र असून तिच्यातील जाणीव सामाजिक आहे. या कवितेचा संबंध इहवाद, बुद्धिवाद, विज्ञानवाद, अनात्मवाद, निरीश्वरवाद, समाजवाद आणि जडवादाशी आहे.
५. वैदर्भीय आंबेडकरी मराठी कविता वैश्विक मानवी मूल्यभाव प्रकट करते. वर्तमानातील समस्यांशी, त्यातील वास्तव प्रश्नांशी थेट भिडते व परिवर्तनाचा जाज्वल्य आशावाद व्यक्त करते.

**संदर्भ (Reference) :**

१. नोमेश नारायण, रक्त फुलांचे ताटवे, राजांचे प्रकाशन, पुणे, २०२३
२. नोमेश मेश्राम, वेदना आभाळ झाली, समता संगर प्रकाशन नागपूर, २००८
३. भूषण रामटेके, मी रांगेतच उभा आहे, विजय प्रकाशन, नागपूर, २०१८
४. विद्याधर बंसोड, फिनिक्स पक्षाच्या कविता, मध्यमा प्रकाशन, नागपूर, २००६
५. अजय चिकाटे, मुठीतील वाळू, विजय प्रकाशन, नागपूर, २०२१
६. भूषण रामटेके, जागतिकीकरण आणि साहित्य समीक्षा, युरो वर्ल्ड पब्लिकेशन नागपूर, २०१९
७. दलित साहित्य पत्रिका, अखिल भारतीय दलित साहित्य महामंडळ, नागपूर, २०११
८. जलावली, स्मरणिका, ६४ विदर्भ साहित्य संमेलन, तळोधी, २०१४

■■■